जा.क्र.माध्य. ३/[१५]/नमाशा/पीआर
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग
पुणे. १ यांचे कार्यालय
दिनांक : 26 SEP 1988

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, पुणे

विषय:- सन .१९८८-८९.. या शैक्षणिक वर्षात नवीन माध्यमिक शाळांना परवानगी मिळणेबाबत...
संदर्भ - एसएसएन १९८८/७४४४ एक माध्यमि दि १८-५-८८

सन १९८८-८९ या वर्षात ~~सोबत जोडलेल्या यादीतील~~ नवीन माध्यमिक शाळेस शासनाकडून परवानगी दिलेली आहे. त्याप्रमाणे आपल्या जिल्ह्यातील शासन मान्यतेनुसार ज्या संस्थांनी ..१९८८... पासून नवीन माध्यमिक शाळा सुरु केलेली आहे. अशा संस्थांनी खालील अटींची पूर्तता केली आहे किंवा नाही याची खात्री करुन याचा पूर्तता अहवाल तसेच शाळेचे तपासणी अहवाल सदर पत्र मिळाल्यापासून ८ दिवसाचे आंत या कार्यालयास पाठवावेत.

अटी :-

१] संबंधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० या दोन्ही अधिनियमाखाली नोंदलेली आहे.

२] संस्थेविरुद्ध गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

३] सदर संस्थेने चालविलेल्या माध्यमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत, अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

तरी वरील अटींची पूर्तता करुन संस्थाचे पूर्तता अहवाल मुदतीत या कार्यालयात पाठवावेत म्हणजे संस्थांना नवीन शाळेचे पाठवावयाचे आदेश या कार्यालयाकडून पाठविले जातील. सदर प्रकरणी संस्थांकडून वारंवार विचारणा होत आहे.

तसेच शाळेचे तपासणी अहवाल या कार्यालयास पाठवावेत.

| क्र. | संस्थेचे नाव | शाळेचे ठिकाण | इयत्ता |
| --- | --- | --- | --- |
| १) | अग्रसेन चॅरिटेबल ट्रस्ट येरवडा, पुणे ६ | येरवडा जि. पुणे | ५ वी व ८ वी. |

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे. १ करिता

प्रत - सेक्रेटरी, अग्रसेन चॅरिटेबल ट्रस्ट, येरवडा, पुणे ६
यांना माहिती व कार्यवाहीसाठी रवाना.